**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**३१ वा दीक्षांत समारंभ**
**शनिवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१५**
**श्री.विश्राम जामदार,**
**मा.अध्यक्ष, बोर्ड ऑफ गव्हर्नर्स,**
**विश्वेश्वरय्या राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्था, नागपूर यांचे**
**दीक्षांत भाषण**

संत गाडगेबाबा विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ. श्री मोहनजी खेडकर, कुलसचिव, प्राध्यापक वर्ग, कर्मचारी वर्ग तसेच विश्वविद्यालयाचे सिनेटचे सदस्य व आजच्या दीक्षांत समारंभासाठी उपस्थित असलेले माझे लाडके विद्यार्थी / विद्यार्थींनी मित्र, पालक वर्ग व अमरावतीचे गणमान्य नागरीक,

आज आपल्या सर्वांबरोबरच माझाही अतिशय आनंदाचा दिवस आहे. कारण अमरावती शहराशी निगडीत माझ्या अतिशय सुखद अशा आठवणी आहेत. कारण इथल्याच इंजिनिअरींग कॉलेजमधे जे पूर्वी नागपूर विश्वविद्यालय अंतर्गत येत असे त्या कॉलेजमधे माझे प्रथम वर्षाचे शिक्षण झाले आहे. त्यावेळेस आम्हाला श्री देशपांडे यांचे प्रिन्सिपॉल म्हणून तर श्री वर्टीकर यांच्या सारख्यांचे जे गणित ह्या विषयाचे जगदविख्यात प्राध्यापक होते. त्यांचे मार्गदर्शन लाभले आहे. ह्या कॉलेजतर्फे मी क्रिकेट खेळलो आहे अशा अनेक सुखद आठवणी ह्या शहराशी निगडीत असल्यामुळे आज मला आनंद होणे साहजिकच आहे.

असे म्हणतात की, आठवणींच्या नगरात माणसांनी शिरू नये कारण शिरतांना आनंद होतो पण त्यामधुन मग बाहेरच पडावेसे वाटत नाही. व म्हणून बाहेर पडतांना यातना होतात. असो.

हे शहर विदर्भाची सांस्कृतिक राजधानी असे म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. कारण ह्या शहरांनी संत गाडगे महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज तसेच प्रज्ञाचक्षु गुलाबबाबा महाराज दिले आहेत. तसेच, वीर वामनराव जोशी, असो की दादासाहेब खापर्डे असो इतकच काय तर आपल्या पूर्व राष्ट्रपती सौ. प्रतिभाताई पाटील असो. ह्या सर्व महान व्यक्ति ह्या देशाला दिल्या आहेत. अशा या भूमीत शिक्षण घेऊन पदवी संपादन करणारे तुम्ही विद्यार्थी खऱ्या अर्थाने भाग्यवान आहात. तुमच्या आयुष्यातला हा मोठा दिवस आहे इतकेच नव्हे तर ज्याला आपण अविस्मरणीय म्हणतो असा क्षण आज आपण सर्व अनुभवतो आहे.

ह्या विद्यापीठाची जी मुद्रीका आहे ती अतिशय बोलकी आहे व त्यामुळे विद्यापीठाची भूमिका एक क्षणात लक्षात येते. मधोमध असलेल्या विद्येचा ज्ञान, सूर्य व ते ज्ञान देणारे एक पुस्तक आणि ह्या पुस्तकातून प्राप्त झालेल्या ज्ञानानी जीवनाला आलेले पूर्णत्व दाखविणारे वर्तुळ खरोखरच लक्षणीय आहे व त्याचबरोबर एक वेगळा संस्कार देणारे आहे. ह्या सर्वांना आपल्या ओंजळीत धरणारे कणीस हे जीवनाचे पोषण तत्व सांगणारे व आयुष्याला आधार देणारे असे आहे.

ह्या सर्वांबरोबर असलेले विद्यापीठाचे ब्रीद वाक्य ''सा विद्या या विमुक्तये'' अतिशय समर्पक असे वाटते.

विद्यार्थी मित्रांनो, अशा या ४७० एकर परिसरात पसरलेल्या, ४१३ विद्यालयांशी निगडीत असलेल्या आणि ३ लक्ष विद्यार्थ्यांना विद्या प्रदान करणाऱ्या ह्या विद्यापीठाचे आज तुम्ही स्नातक म्हणून जाणार आहात. तुमच्या सर्वांसाठी अतिशय आनंदाचा तसेच गौरवाचा दिवस आहे. विद्यापिठासाठी देखील हा गौरवाचा क्षण आहे. कारण ते आज इतके प्रतिभावंत स्नातक समाजाला देत आहेत. त्यामुळे आजचा दिवस विद्यार्थ्यांसाठी तसेच विद्यापिठासाठी म्हणतात त्याप्रमाणे Win Win Situation चा दिवस आहे.

विद्यार्थी मित्रांनो, ह्याची जाणीव ठेवावी की, तुम्ही जरी मेहनत घेऊन ही पदवी संपादित केली असली तरी बरेच परिश्रम विद्यापीठाच्या शिक्षक वर्गांनी देखील तुमच्यासाठी घेतले आहेत. आणि त्यांच्या ह्या परिश्रमातूनच तुम्हाला ही ज्ञान गंगा प्राप्त झाली आहे. तसेच संत गाडगे बाबांचे देखील आशीर्वाद तुम्हाला ह्या योगे प्राप्त झाले आहेत, असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

आपल्यापैकी काही विद्यार्थी जे आज स्नातक/पदवीधारक होतील व जे आपलं शिक्षण इथेच थांबवतील त्यांची एका अर्थाने ''विद्यार्थी दशा'' समाप्त होईल व ते आज एका वेगळ्या मुक्ततेचा अनुभव घेत असतील. कारण ह्यापुढे त्यांना अभ्यासाचे, परिक्षेचे तसेच निकालाचे वगैरे किंवा तत्सम काही तणाव राहणार नाही. परन्तु त्यांना लवकरच हे ध्यानात येईल की शिक्षण घेणे, अभ्यास करावा लागणे, हीच जीवनाची इति कर्तव्यता आहे.

दैनंदिन जीवनामधे येणारी आव्हाने जर सशक्ततेने पेलावयाची असतील व त्यामधे सफलता मिळवायची असेल तर आवश्यक त्या गोष्टी शिकाव्याच लागतात. केवळ शिकून नाही तर त्यामधे तरबेज झाल्याशिवाय यश मिळत नाही. आणि म्हणून सतत शिकत राहणे ह्याला पर्याय नसतो.

गेल्या दशकात अनेक बाबींमधे आमुलाग्र बदल झाले आहेत. ते बदल आज वैश्विक स्वरूपाचे आहेत. त्यामुळे त्यांची आव्हाने देखील मोठी आहेत. ह्या पार्श्वभूमिवर आजचे आपले शिक्षण खरे उतरते का ? हा एक चिंतनाचा विषय आहे.

आजचे आपले शिक्षण आपल्याला -

१) वस्तुस्थितीचा योग्य परामर्श घेणे शिकविते कां ?

२) आपल्यामधे असलेला न्यूनगंड काढून टाकण्याचे कसब देते कां ?

३) आजच्या विद्यार्थ्याला मुळातच समजदार करण्याची प्रक्रिया शिक्षणामधून मिळते कां ?

४) संस्कारमय जीवन आणि सामाजिक दायित्वाची जाणीव करून देणारे आजचे शिक्षण आहे कां ?

५) आजचे शिक्षण तरूणाच्या उद्यमशीलतेला जोपासण्याचे / वाढीला लावण्याचे कार्य करते कां ?

वरील सर्व गोष्टींचे यथायोग्य उत्तर शोधण्याचा आपला प्रयत्न प्रामाणिक असला तरी ज्या गतीने आज काळ बदलतो आहे ती गती आत्मसात करण्यामधे आपण कमी पडतो आहे असा भास होतो. आजची पिढी त्यादृष्टीनी खरोखरच नशीबवान आहे असं मला वाटतं. कारण की, आज तरूणांना अनेकानेक संधी उपलब्ध आहेत. इतकेच नव्हे तर इंटरनेटच्या माध्यमातून हाताच्या बोटावर ज्ञानाचे अलौकिक भांडार उपलब्ध आहे. त्याचा योग्य तो वापर केला तर अनेक प्रश्नांची योग्य ती उत्तरे मिळू शकतात.

आजच्या तरूणासमोरील विविध आव्हानाचा विचार केला तर लक्षात येते की, त्यामधे विलक्षण उत्सुकता आहे. धडाडी आहे. इतकेचे नव्हे तर तो मोठी मोठी स्वप्न जोपासतो आहे. त्यामुळे ह्या सर्व बाबी शिक्षणाच्या माध्यमातून सोडविण्याचे मोठे आव्हान शिक्षण तज्ज्ञावर आहे, असे खात्रीपूर्वक म्हणता येईल. विकसित राष्ट्रामधेच नव्हे तर विकसनशील देशामधे देखील अनेक विश्वविद्यालयामधे आज ह्याबाबत गंभिरतेने चिंतन करीत असल्याचे लक्षात येत आहे. त्याचाच परिणाम म्हणून अनेक होतकरू विद्यार्थी परदेशामधे जाऊन आपली स्वप्नपूर्ती करण्याचा मार्ग स्विकारीत आहेत. उदाहरण घ्यायचे झाल्यास, ऑस्ट्रेलिया सारख्या देशामधे इतर देशातील तरूण विद्यार्थ्यांची संख्या इतकी जास्त झाली आहे की त्या देशाच्या अर्थकारणावर ह्याचा मोठ्या प्रमाणात प्रभाव पडला आहे. ह्या विद्यार्थ्यांनी जमा केलेल्या फी ची रकम ऑस्ट्रेलियाला इतके परकीय चलन मिळवून देते की त्या देशाचे जवळपास १/३ उत्पन्न ह्या माध्यमातून त्यांना मिळत आहे.

विद्यार्थी मित्रांनो, आपणास जर काही प्रश्न मी विचारले तर वाईट वाटून घेऊ नका. मला ताबडतोब उत्तर हवे आहे असे देखील नाही पण हे खरोखर सांगा की आपल्यापैकी किती लोकांना नोकरी हवी आहे ? कदाचित सर्वच जण म्हणतील की, हा काय प्रश्न आहे ? आम्हा सर्वांनाच नोकरी हवी आहे ?

पण मी जर विचारले की, आपल्यापैकी किती जण हा विचार करतात की, मी नोकरी करणार नाही, पण असा उद्योग करीन की ज्यामुळे मी माझ्या विद्यालयाच्या मुलांना नोकरी देऊ शकेन ? असा विचार करणारे खुप कमी असतील पण काही तरूणांनी जरी हा विचार केला तरी मोठे समाधान मिळेल.

आपण किती दिवस Job-Seekers राहणार. कधीतरी कोणीतरी Job-Provider होणार की नाही.

ह्यालाच उद्यमशीलता म्हणतात, ही आपण जोपासायला पाहिजे. त्यासाठी जरूरी नाही की आपण काही संशोधन करून मगच त्याचे उत्पादन करायला हवे. किंवा असेही नाही की काही गोष्टी नव्या शोधून काढाव्या तर अनेक गोष्टी नव्या पद्धतीनी कशा करता येतील हे शोधणे म्हणजे उद्यमशीलता. माझे वैयक्तिक आकलन असे आहे की, भारतीय तरूण हा मुळातच उद्यमशील आहे. हे विचार कदाचित धाडसाचे वाटतील पण आपण जर आजूबाजूला थोडी नजर टाकली तर ही गोष्ट आपल्याला प्रकर्षाने लक्षात येऊ शकते.

उदाहरण घ्यायचे झाल्यास असे लक्षात येते की, मोटर सायकल चालविणारा अगदी खेड्यातील युवक त्याची बाईक बंद पडल्यावर काहीना काही तरी जुगाड करून सुरू करतो. त्याला कोणतेही ऑटो शिक्षण दिले नसते. तसेच गावामधे शेतात ट्रॅक्टर बंद पडल्यास किंवा त्याच्या शेतकी औजारात बिघाड झाल्यास तो काहीतरी करून ते ठिक करतो व आपले शेत नांगरतो. कारण मुळातच त्याला आपला कार्यभाग साधायचा असतो.

रस्त्याच्या कडेला असलेले गॅरेजचे असे किती मेकॅनिक असतात ज्यांनी खरोखरच ऑटो इंजिनियरींग चे शिक्षण घेतले असते ? इतकेच नव्हे तर रस्त्यावरचे पाणी-पुरीवाले किंवा फास्ट-फुडवाले असे किती आहेत ज्यांनी हॉटेल मॅनेजमेंट केले आहे किंवा कुकींगचा कोर्स केला आहे ?

ह्या सर्वांचे उत्तर एकच आहे की, सामान्य तरूणापाशी वेगवेगळ्या पद्धतीने काम करण्याचे वेगळेच कसब त्यामधे उपजतच आहे. कमी आहे ती त्याला त्याची जाणीव करून देण्याची.

ही उद्यमशीलता भारतीय तरूणामधे सर्व स्तरावर बघायला मिळेल. त्याचाच भाग म्हणून आपण MOM सारखी योजनात केवळ ७० कोटी डॉलर्स मधे पूर्ण करू शकलो. ज्यासाठी अमेरिकेला आपल्यापेक्षा १० पट जास्त म्हणजे ७०० कोटी डॉलर्स मोजावे लागले.

आपली ''चांद्रायाण'' मोहिम देखील पहिल्याच प्रयत्नात अतिशय कमी पैशात यशस्वी झाली हे सांगायला अभिमान वाटतो. नासाचे शास्त्रज्ञ अवाक् झाल्याचे आपण ऐकलेच आहे.

थोडक्यात सांगायचे झाल्यास उद्यमशीलता म्हणजे केवळ नवे संशोधन, नवी संकल्पना, नवीन मार्ग शोधून काढणे नसून एखादी गोष्ट नवीन परन्तु सोप्या पद्धतीने कशी करावी हे शोधणे आहे. जे आपण चांगले करू शकतो.

ह्यासाठी मात्र आपण आपल्यामधे असलेली कस्तुरी शोधली पाहिजे. ती शोधल्यास अनेक गोष्टी साधता येतात. पण त्यासाठी स्वत्व शोधणे व आपल्यातील न्यूनगंड त्यागने महत्वाचे आहे.

(डॉ. ए.पी.जे. कलामांचे उदाहरण )-

विद्यार्थी मित्रांनो, आपण आज सर्व पदवी घेऊन बाहेर पडत आहात. आपल्याला उच्चतम यश आपणास मिळो व यशाची अनेक शिखरे आपण काबीज करावी ही इच्छा व्यक्त करून व मला माझ्या सुखद आठवणींना उजाळा देण्याची संधी प्राप्त करून दिल्याबद्दल धन्यवाद देऊन मी माझे वक्तव्य समाप्त करतो.

*****